पुढारी

# 'रवळनाथ'चा वार्षिक व्यवसाय ६४१ कोटी

## संस्थाध्यक्ष एम. एल. चौगुले यांची माहिती

**गडहिंग्लज : पुढारी वृत्तसेवा**



**एम. एल. चौगुले**

रवळनाथ को-ऑप. हौसिंग फायनान्स सोसायटीचा २०२२-२३ या आर्थिक वर्षात एकूण व्यवसाय ६४१ कोटी झाला असून २ कोटी २४ लाखांचा निव्वळ नफा झाला आहे. कोरोनानंतरच्या या वर्षातदेखील संस्थेच्या सर्वोत्तम कामगिरीचा वाढता आलेख कायम राहिला आहे, अशी माहिती संस्थाध्यक्ष एम. एल. चौगुले यांनी दिली.

संस्थाध्यक्ष चौगुले म्हणाले, ३१ मार्चअखेर संस्थेची सभासद संख्या १०,६६६ इतकी आहे. एकूण ३८० कोटींच्या ठेवी, तर २६१ कोटींची कर्जे आहेत. खेळते भांडवल ४३७ कोटींचे असून एकूण गुंतवणूक १४९ कोटींची आहे. मोबाईल बँकिंग, सीबीएस, मायक्रो एटीएम याद्वारे डिजिटल सेवा दिली जाते. तसेच आरटीजीएस/एनईएफटी, लॉकर, वीज बीलभरणा यासह पेन्शनधारक व ज्येष्ठ नागरिकांच्या सोयीसाठी नॅशनल ॲटोमेटेड क्लिअरिंग हाऊस (नॅच) ही सेवा तसेच गंभीर आजारी व वृद्ध ग्राहकांना घरपोच सेवा सुरू आहे. संस्थेला स्वतंत्र आयएफएससी कोड मिळाला आहे.

सध्या आजरा, गडहिंग्लज, चंदगड, नेसरी, कोल्हापूर, जयसिंगपूर, बेळगांव, निपाणी, कुडाळ, सांगली या ठिकाणी संस्थेच्या शाखा आहेत. सोने तारण व गृहोपयोगी उपकरणे खरेदी कर्ज सुविधा असून प्लॅट खरेदी व गृहकर्जाची मर्यादा ९० लाख, तर शैक्षणिक कर्जाची मर्यादा ५० लाखांपर्यंत आहे. संस्थेच्या प्रगतीसाठी उपाध्यक्ष प्रा. व्ही. के. मायदेव, मुख्य कार्यकारी अधिकारी डी. के. मायदेव, सर्व शाखांचे अध्यक्ष व सल्लागार, संचालक, अधिकारी, शाखाधिकारी व कर्मचारी यांच्यासह सभासद, ठेवीदार, कर्जदार, ग्राहक यांचे मोलाचे सहकार्य लाभले, असेही चौगुले यांनी सांगितले.

My Kolhapur Edition
Apr 3, 2023 Page No. 9
newspaper.pudhari.co.in